# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्रःउपायुक्त /आ.व्य/223/ओडी दि.07.05.2021**

विषय :- ड्रिम्स दि मॉल, एल.बी.एस. रोड, भांडुप (प) मुंबई – ४०० ०७८ येथे दि. २५ मार्च २०२१ रोजी २३.५७ वा. लागलेल्या भीषण आगीच्या चौकशीबाबतचा अहवाल.

संदर्भ :- मा. महानगरपालिका आयुक्त यांचे चौकशी करण्याबाबतचे आदेश क्र.CPA/१०२४९ दि. २६.०३.२०२१

उपरोक्त विषयान्वये निम्नस्वाक्षरीकार यांना संदर्भीय पत्रात नमूद केलेल्या एकंदरीत पाच मुद्द्यावर आधारीत चौकशी करण्याबाबत आदेश पारीत करण्यात आले होते. सदर चौकशी १५ दिवसात पूर्ण करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते. परंतु निम्नस्वाक्षरीकार दि.१४.०४.२०२१ रोजी कोव्हीड आजाराने ग्रस्त असल्याकारणास्तव त्यांना रूग्णालयात उपचाराकरीता दाखल व्हावे लागले. यास्तव दोन आठवडयांची वाढीव मुदत घेण्यात आली होती.

वरील संदर्भित मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार संपूर्ण प्राथमिक चौकशी अहवाल सोबत जोडण्यात येत आहे.

सदर प्रकरणी मॉल व रुग्णालय प्रशासन तसेच मे.पोना कॉर्पोरेशन व अनधिकृत गॅस सिलेंडरचा साठा केल्याबद्दल बॅक्वेट हॉल प्रशासन यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पोलीस निरीक्षक, भांडूप यांच्याकडे चौकशी दरम्यान प्रमुख अग्निशमन अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त एस विभाग यांना निर्देश देऊन तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. त्याबाबतच्या कारवाईचा तपशील पोलीस निरीक्षक, भांडूप यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

कृपया अहवाल आपल्या मंजूरीकरिता सविनय सादर.

सोबत: 2 नस्ती धारिणीत व पेन ड्राईव्ह

7/5/21

श्री. प्रभात रहांगदळे
उप आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन)

(श्री. इ.सिं. चहल)
मान.महानगरपालिका आयुक्त
महोदय,

- चौकशी अहवाल मान्य.
- अतिरिक्त आयुक्त, (प. उपनगरे) पृ.क्र. 19 ते 21 वरील निष्कर्ष व त्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाही दर्शक पृष्ठ क्र. 23 ते 29 वरील शिफारशींवर पुढील एक महिन्यात Action Taken Report (ATR) सादर करतील.

महानगरपालिका आयुक्त 7/5/21

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
प्रमजीसी उपविभाग
C-8505
- 7 MAY 2021
बैठक १०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१
क्रमांक MGC/F/4457

(SF)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय: दि.25.03.2021 रोजी भांडूप येथील ड्रिम्स मॉल या ठिकाणी लागलेल्या आगीच्या अनुषंगाने करण्यात येत असलेली प्राथमिक चौकशी.

संदर्भ: मा.महानगरपालिका आयुक्त यांचे क्रं.सीपीए/10249 दि.26.03.2021 अन्वयेचे आदेश.(पृष्ठ क्र.प-1)

दि.25.03.2021 रोजी रात्री 11:57 वाजता लाल बहादूर शास्त्री मार्ग, भांडूप येथे स्थित ड्रिम्स मॉल या व्यवसायिक इमारती मध्ये आग लागली. सदर दुर्घटनेमध्ये मॉल मधील तिस-या माळयावरील सनराईज हॉस्पिटल येथे उपचाराकरीता दाखल झालेल्या 11 रुग्णांचा मृत्यू झाला.

या दुर्घटनेची दखल घेऊन मा.मनपा आयुक्त यांनी क्र.सीपीए/10249 अन्वये दि.26.03.2021 रोजी सदर प्रकरणी प्राथमिक चौकशीचे आदेश पारीत केले आहेत.

सदर आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी निवेदने नोंदवून घेऊन कागदोपत्री पुरावे संकलित करण्यात आले. निवेदनांचा गोषवारा परिशिष्ट 'अ' मध्ये तर कागदोपत्री पुराव्यांची अनुक्रमणिका परिशिष्ट 'ब' येथे संलग्नित करण्यात आली आहे.

मा.मनपा आयुक्त यांनी संदर्भाधीन क्रमांकान्वये पुढील नमुद मुद्दयांच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

1. प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्या समन्वयाने आगीच्या कारणाचा शोध घेणे.
2. शॉपींग मॉल तसेच सनराईज रुग्णालयाकरिता आवश्यक त्या परवानग्या/मान्यता देण्यात आल्या होत्या का, नसल्यास संबाधीतांवर जबाबदारी निश्चित करणे.
3. अग्निशमन तसेच अग्निप्रतिबंधात्मक उपाय योजनांची परीपुर्ती करण्यात मॉल तसेच रुग्णालयांकडून काही त्रुटी राहीली का? तसे आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे.
4. अग्निशमनाचे कार्य करण्यात काही त्रुटी झाल्या का ?
5. अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शिफारशी करणे किंवा त्या संदर्भातील इतर बाबी.

सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेली निवेदने व कागदोपत्री पुराव्यांच्या अनुषंगाने सदर प्रकरण पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**<u>तपासाचा दृष्टीकोन आणि कार्यपद्धती :-</u>**

दि. 26.03.2021 रोजी घटनास्थळाला भेट दिली व मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशात नमूद केलेल्या बाबी पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीकोनातून खालील बाबींचा अवलंब करण्यात आला.

## (अ) प्रत्यक्ष स्थळ भेट

1. ड्रिम्स मॉल इमारत मुंबईतील पूर्व उपनगरातील भांडूप येथील लाल बहादूर शास्त्री मार्ग येथे असुन सदर इमारत 1 तळघर (पार्किंग व पंपरूम) + तळ मजला (निम्नस्तर) (विविध प्रकारची दुकाने व कार्यालये)+ तळ मजला (उच्चस्तर) (विविध प्रकारची दुकाने व कार्यालये) + 1 ला मजला (विविध प्रकारची दुकाने व कार्यालये) + 2 रा मजला (मल्टीप्लेक्स सिनेमागृह, बँक्वेट हॉल व विविध प्रकारची दुकाने व कार्यालये)+ 3 रा मजला (अंशतः) (सनराईज हॉस्पीटल) इतक्या मजल्यांची आहे. सदर मॉलमध्ये एकुण अंदाजे 1097 विविध प्रकारची दुकाने व कार्यालये आहेत.
2. घटनास्थळावर जाऊन घटनास्थळाचे छायाचित्रण, व्हिडिओ चित्रण करणे.(पृष्ठ क्र.प-43 ते प-61)
3. मुंबई अग्निशमन दलाचे अधिकारी ज्यांनी घटनास्थळी प्रथम प्रतिसाद दिला तसेच इतर संबधीत वरिष्ठ अधिकारी यांच्या सोबत घटनास्थळी प्रत्यक्ष जाऊन प्रथम प्रतिसाद अधिकारी यांच्याकडून संपुर्ण घटनाक्रम व त्याप्रमाणे केलेली कार्यवाही याची पुनरावृत्ती करणे.
4. मुंबई अग्निशमन दलाचे प्रथम प्रतिसाद अधिकारी, त्यांचे निकटचे वरिष्ठ अधिकारी ज्यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष अग्निशमन व विमोचना निर्णय घेताना त्या मागचा विचार व प्राधन्यक्रम समजाऊन घेणे.
5. दुर्घटना झाल्यानंतर सनराईज रुग्णालयातील सी.सी.टी.व्ही.द्वारे प्राप्त चित्रणाचा सखोल अभ्यासकरुन प्रत्यक्ष घटनेच्या वेळी झालेल्या कार्यवाहीचे विश्लेषण करणे.(**परिशिष्ट -ड**)
6. प्रत्यक्ष भेटीच्या वेळेस महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये अनधिकृत एल.पी.गॅस सिलेंडर साठयाकरीता स्थानिक पोलिस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे सहाय्यक आयुक्त एस विभाग तसेच प्रमुख अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल यांना निर्देश देण्यात आले.

## (ब) विविध खात्याने दिलेल्या परवानग्या व तद्संबंधीची कागदपत्रे

1. ड्रिम्स मॉल तसेच सनराईज रुग्णालयाला मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यामार्फत देण्यात आलेल्या परवानग्या बाबत तसेच संबधित अधिका-यांना प्रत्यक्ष बोलाऊन देण्यात आलेल्या परवानग्याबाबत केलेल्या तपासणी व कार्यवाही बाबतची कार्यपद्धती समजाऊन घेतली व त्या संदर्भात काही त्रुटी असल्यास त्या शोधण्याचा प्रयत्न केला.
2. विविध खात्याने दिलेल्या परवानग्या/अहवाल तपासून त्यातील तथ्याची नोंद केली.
3. ड्रिम्स मॉल तसेच सनराईज रुग्णालयाचा मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यामार्फत देण्यात आलेल्या परवानग्या/अहवालांचे संबंधित खात्यांच्या अस्तित्वात असलेल्या कार्यपद्धती (DCR/DCPR)नुसार परिपूर्तता अहवाल दिला गेला आहे किंवा नाही याचे पुर्नरावलोकन केले.

## (क) अग्निशमन व विमोचन

प्रत्यक्ष घटनास्थळावरील अग्निशमन दल व इतर संसाधनांचे जसे अग्निशमन दल नियंत्रण कक्ष, आपत्कालीन नियंत्रण कक्ष, एस विभाग अधिकारी यांचे कर्तव्य व त्यांचे अग्निशमन व विमोचनामधील प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन स्थितीची माहिती मिळवणे.

**(ड) आगीच्या तपासाबाबत**

मुंबई अग्निशमन दल यांचे संबंधित तपास अधिकारी यांच्याशी समन्वय साधून खालीलप्रमाणे आगीच्या कारणाचा तपास व इतर बाबींचे दस्तऐवजीकरण करण्याकरिता योग्य मार्गदर्शन देण्यात आले.

1. आगीचे उगम स्थळ निश्चित करणे.
2. परिस्थितीजन्य पुराव्याचा शोध.
3. मुंबई अग्निशमन दलाच्या तपास अधिका-याने आगीच्या कारणांचा शोध घेण्याकरीता साक्षीदारांच्या घेतलेल्या साक्षी.
4. ड्रिम्स मॉल तसेच सनराईज रुग्णालयाने प्रतिबंधात्मक तसेच दूर्घटना टाळण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना राबविण्यात आलेल्या कार्यपद्धतीत कोणत्या त्रुटी आढळल्या याचा शोध घेऊन त्याचे विश्लेषण.

**(इ) शिफारस**

भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना होऊ नयेत याकरिता आवश्यक त्या महानगरपालिकेच्या विविध खात्यांच्या कार्यपध्दतीचे पुनरावलोकन करुन योग्य त्या उपाययोजनांची शिफारस करण्यात आली.

## मा.मनपा आयुक्त यांच्या आदेशान्वये करण्यात आलेल्या चौकशी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबी

### 1. आगीचे कारण

(अ) प्राथमिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपास अधिकारी यांच्या बरोबर अहवालाचे विश्लेषण करण्यात आले तसेच योग्य ते मार्गदर्शन देऊन आगीच्या तपास अहवालात आगीचे कारण स्थापित करण्यात आले.

(ब) प्रमुख अग्निशमन अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार दि.25.03.2021 रोजी ड्रिम्स मॉल, एल.बी.एस. मार्ग भांडुप येथे आग तळमजला(उच्चस्तर) या ठिकाणच्या "**सदोष विद्युत प्रणालीमुळे**" लागली होती व आगीमुळे निर्माण झालेला धुर तिस-या माळयावरील रुग्णालयामध्ये पसरला होता.(पृष्ठ क्र.प-3 ते प-41) सदर आगीचे कारण खालील मुद्दयांच्या विश्लेषणाअंती प्रस्थापित करण्यात आल्याने निम्नस्वाक्षरीकार त्याच्याशी सहमत आहेत.

1. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या नोंदविण्यात आलेल्या साक्षी
2. परिस्थितजन्य पुरावे
3. आगीच्या संभाव्य कारणांच्या पडताळणीअंती

याबाबतचा सविस्तर अहवाल **परिशिष्ट-क** येथे संलग्नित करण्यात आलेला आहे.

## 2. शॉपींग मॉल तसेच सनराईज रुग्णालयाकरिता विविध खात्याने दिलेल्या आवश्यक त्या परवानग्या/मान्यतांच्या अनुषंगाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे.

शॉपींग मॉल तसेच सनराईज रुग्णालयाकरिता विविध खात्यांनी दिलेल्या परवानग्या व त्या संबंधीत कागदपत्रांचे अवलोकन करुन तद्अनुषंगाने संबंधितांची निवेदने नोंदवून घेतली, त्याद्वारे खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आली.

**इमारत प्रस्ताव खाते**

ड्रिम्स मॉल या व्यवसायिक इमारतीस तळघर तसेच पहिला व दुसरा मजला यांच्याकरीता दि.25.06.2004 रोजी इमारत प्रस्ताव खात्याने I.O.D. निर्गमित केल्या होत्या.(पृष्ठ क्र. प-63 ते प-77) त्याबाबतच्या कार्यवाही नंतर दि.01.09.2009 रोजी तळघर ते दुसरा मजला एवढया भागासाठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले होते. (पृष्ठ क्र. प-79) तदंनतर 2011 साली ड्रिम्स मॉलचे विकासक व सनराईज रुग्णालय यांच्याकडून वापरात बदल करण्याकरीताचा (कार्यालयासाठी राखीव भागात रुग्णालय) प्रस्ताव इमारत प्रस्ताव खात्यामार्फत तत्कालिन आयुक्त यांना सादर करण्यात आला होता.(पृष्ठ क्र.प-81) सदर प्रस्तावावर तत्कालिन मा.आयुक्त यांनी क्र. एमजीसी / बी / 8 9 1 7 दि. 31.10.2011 अन्वये, "अनधिकृत बांधकामाचे क्षेत्रफळ हे चटई क्षेत्रात अंतर्भूत करता येणे शक्य आहे का हे पडताळण्यात यावे व पुढील कोणतीही मान्यता अथवा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येऊ नये"

असे आदेश पारीत केले होते. (पृष्ठ क्र. प-83 ते प-86) विकासक मे.एच.डी.आय.एल.यांना निर्गमित केलेल्या I.O.D. मधील, पार्किंग इमारत महानगरपालिकेला हस्तांतरीत न करणे, मॉल मधील गाळयांमध्ये अनधिकृत बांधकामे, सामायिक जागेचा कर न भरणे तसेच सदर विकासक कर्जबाजारी घोषित झाल्यामुळे वरील बाबींची पूर्तता अद्याप झालेली नाही.यास्तव ड्रिम्स मॉल या व्यवसायिक इमारतीला अद्यापपर्यंत पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणी इमारत प्रस्ताव खात्यातील अधिकारी यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन सन 2020 मध्ये मे.प्रिव्हीलेज हेल्थ केअर सर्व्हिसेस प्रा.लि. च्या संचालक डॉ.निकीता त्रेहान यांनी दि.25.04.2020 रोजी सनराईज रुण्यालयाबद्दल मा.आयुक्तांना निवेदन सादर केले होते. तदंनतर तत्कालिन आयुक्त यांनी 'रिवायव्हल सनराईज हॉस्पिटल' नावाचा एक वॉटस् ॲप ग्रुप वर सदर कालावधीतील कोव्हिड परिस्थितीच्या अनुषंगाने त्या ठिकाणी तात्पुरते भोगवटा प्रमाणपत्र देण्याकरिताची कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश इमारत प्रस्ताव खात्याला दिले. तद्अनुषंगाने इमारत प्रस्ताव खात्याने क्र. सीई/953/बीपीईएस/एएस अन्वये दि.26.04.2020 रोजी मा.आयुक्त यांना प्रस्ताव सादर केला. (पृष्ठ क्र.प -87 ते प- 93) सदर प्रस्तावामध्ये यापूर्वी तत्कालिन मा. आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालातील नमूद अनियमिततेचा उदा. अनधिकृत बांधकामे, पार्किंग इमारत मनपाला हस्तांतरीत न करणे, मे.एच.डी.आय.एल. हे कर्जबाजारी घोषित झाल्याचे इ. उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे सदर अहवालात अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अंतर्गत आवश्यक परिक्षणे करुन त्याबाबतचा अहवाल (प्रपत्र - ब) प्राप्त करुन घेण्याबाबत देखील संबंधित मॉलला सांगण्यात आल्याचे नमुद केले आहे. दि.30.04.2020 रोजी प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांनी त्यावर "सद्य परिस्थिती पाहता आणि रुग्णालयाची तातडीची गरज बघता प्रस्तावातील सर्व समस्या बाजूला सारुन एक महिन्याच्या आत मे.एच.डी.आय.एल. यांना संमती पत्र सादर करण्यास सांगून हॉस्पिटल भागापूरता अनधिकृत कामे प्रचलित धोरणानुसार नियमित करुन हॉस्पिटलला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात यावे"असे अभिप्राय

दिले.(प-95) त्यावर दि.27.04.2020 रोजी तत्कालिन महानगरपालिका आयुक्त यांनी कोव्हिड-19 महामारीच्या अपवादात्मक परिस्थितीमुळे सर्व रुग्णालये वापरात आणण्याची गरज आहे. सदर रुग्णालय हे आरोग्य आणि फ्रंट लाईन कर्मचारी यांच्याकरीता खास राखुन ठेवण्यात यावे असे आदेश दिले होते. मे.प्रिव्हीलेज हेल्थ केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्यामार्फत कोणताही प्रस्ताव इमारत प्रस्ताव खात्याकडे प्राप्त झाला नव्हता. तदंनतर सनराईज रुग्णालयातर्फे वास्तुविशारद श्री. दिलिप देशमुख यांनी महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाच्या संकेत स्थळावर संपूर्ण प्रस्ताव सादर करुन सनराईज रुग्णालयास भोगवटा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली. सदर प्रस्तावाच्या छाननी मध्ये काही अनिवार्य कागदपत्रांची कमतरता होती ही बाब नमुद करून प्रस्ताव मा.आयुक्तांच्या विचारार्थ व मंजूरीकरीता सादर करण्यात आला. त्यावर तत्कालिन मा.आयुक्त यांनी विशेष बाब म्हणून मंजूरी दिली. (पृष्ठ प 97) तत्कालिन मा.आयुक्तांच्या सदर मंजूरी अन्वये दि.06.05.2020 रोजी सनराईज रुग्णालय यांना तात्पूरता भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले.(पृष्ठ क्र.प-99 ते प-103) सदर तात्पुरत्या भोगवटा प्रमाणपत्रामध्ये अग्निसुरक्षा प्रणालीही महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये सुस्थितीत असल्याबाबत अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासापेक्ष असे नमूद करुन श्रीम. त्रेहान यांना कळविले आहे. अशाप्रकारे महामारीची परिस्थिती पाहता अत्यावश्यक बाब म्हणून सनराईज रुग्णालय सुरू करण्यासाठी आवश्यक अटींच्या पूर्ततेसापेक्ष विशेष मंजूरी देण्यात आली होती.

प्रसंगवशात येथे असे नमुद करण्यात येते की, दि.06.08.2020 रोजी श्री.खानोलकर, उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव)पूर्व उपनगरे यांनी प्रमुख अभियंता(विकास नियोजन) यांनी मा.आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालामध्ये सनराईज रुग्णालयाच्या संचालिका डॉ. निकीता त्रेहान या मे.एच.डी.आय.एल. या कंपनीच्या देखील संचालिका असल्याचे नमुद केल्याचे निदर्शनास येत आहे. (पृष्ठ क्र.प-115 ते प-125) सदर प्रकरणी मा.आयुक्त यांनी दि.29.10.2020 रोजी संबंधित अभिलेखांवरील अर्जांची छाननी करुन काटेकोरपणे नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्याबाबत कायदा अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन प्रस्ताव मा.आयुक्तांना सादर करण्यात आला.(पृष्ठ क्र.प-111 ते प-113) इमारत प्रस्ताव खात्यामार्फत सनराईज रुग्णालयाला दिलेले तात्पुरते भोगवटा प्रमाणपत्र रद्दबातल ठरविण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत मा.आयुक्त यांनी दि.31.03.2021 रोजी, सदर रुग्णालयाबाबत विविध खात्यांमार्फत उपस्थित केलेल्या त्रुटींबाबत संपुर्ण पूर्तता झाल्याशिवाय कोणतीही परवानगी देण्यात येऊ नये असे आदेश पारित केले आहेत.

**आरोग्य विभाग**

प्रस्तुत प्रकरणी आरोग्य खात्यामार्फत ड्रिम्स मॉल या व्यवसायिक इमारतीमध्ये दुस-या मजल्यावरील बँक्वेट हॉल यांना स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीकोनातून अनुज्ञापन परवाना(पृष्ठ क्र. प -127) तसेच तिस-या मजल्यावरील सनराईझ हॉस्पिटल या रुग्णालयाची Bombay Nursing Home Registration Act 1949 अंतर्गत नोंदणी करण्यात आली होती.(पृष्ठ क्र.प-135)

प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे रुग्णालयाची नोंदणी करताना रुग्णालय वापराकरता सक्षम अधिका-याकडून मंजूर केलेल्या रूग्णालयाकरिताचा आराखडा, तात्पुरता भोगवटा प्रमाणपत्र(PROVISIONAL PART O.C.), मुंबई अग्निशमन दलाच्यामार्फत सदर रुग्णालयाकरीता FIRE COMPLIANCE CERTIFICATE, स.अ. इमारत व कारखाने ना हरकत प्रमाणपत्र, डॉक्टर व नर्सेस सर्टिफिकेट, Bio

Medical Waste Disposal ची व्यवस्था या आवश्यक कागदपत्रांची रुग्णालय व्यवस्थापनाकडून पूर्तता झाल्यानंतर उप कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्याकडून मंजूरी घेण्यात येते. ड्रिम्स मॉल मधील तिस-या मजल्यावर स्थित सनराईज रुग्णालय यांची नोंदणी करतानाच्या वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) एस विभाग यांनी क्र.एचओ/4838 दि.05.09.2020 रोजी तयार केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रुटींच्या पूर्ततेसापेक्ष मंजूरीकरिता सादर केला असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर प्रस्तावास अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी सशर्त मंजूरी दिलेली आहे (पृष्ठ क्र.प-129 ते प-133). वैद्यकीय अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सनराईज हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. निकीता त्रेहान यांनी पूर्तता करणार असल्याचे लेखी हमीपत्रे दिलेली आहेत.(पृष्ठ क्र.प-295 ते प-309)

वैद्यकीय आरोग्य अधिकारी एस विभाग यांनी ड्रिम्स मॉल येथील दुस-या माळयावर स्थित बँक्वेट हॉल मधील खाद्यगृहास कलम 394 अंतर्गत नोंदणी प्रचलित पध्दतीनुसार विविध विभागांच्या ना हरकत प्रमाणपत्रासापेक्ष जसे सहाय्यक अभियंता(इ. व का.)विभाग व मुंबई अग्निशमन दल यांचे अग्निशमन व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांचे प्रमाणपत्र घेऊन करण्यात आली होती. परंतु संपुर्ण बँक्वेट हॉलची तपासणी त्यावेळेस केलेली दिसुन येत नाही. दि.25.03.2021 रोजी लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवताना अग्निशमन दलाला दुस-या मजल्यावर स्थित बँक्वेट हॉल येथे 45 एल.पी. गॅस सिलेंडर आढळून आले. याबाबत हॉलच्या व्यवस्थापकावर पोलिसांमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.(पृष्ठ क्र.प-137 ते प-139) वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या कर्तव्यसूचीनुसार कलम 394 अंतर्गत नोंदणी केलेल्या आस्थापनांचे निरिक्षण करुन त्यांना देण्यात आलेल्या अनुज्ञापनाच्या नियमांतर्गत कामकाज चालू असल्याची पहाणी करणे हे त्यांचे कर्तव्य असताना त्यांनी ड्रिम्स मॉल या ठिकाणी तद्अनुषंगाने पहाणी केली नसल्याचे निदर्शनास येत आहे. परवानगीपेक्षा अतिरिक्त एल.पी.गॅस सिलेंडर साठा आगीच्या भक्षस्थानी पडण्याअगोदर आगीवर ताबा मिळवल्यामुळे मोठी हानी टळली. (छायाचित्रे- पृष्ठ क्र.प-43)

**<u>इमारत व कारखाने व पदनिर्देशित अधिकारी (एस विभाग)</u>**

दि.25.03.2021 रोजी आगीवर नियंत्रण मिळवताना ड्रिम्स मॉल या ठिकाणी दर्शनी भागातील खिडक्यांच्या पाठीमागील बाजूस (ग्लास फसाड) अनधिकृतपणे भिंत उभारल्याचे निदर्शनास आले. याबाबत संयुक्त पहाणी करण्याचे निर्देश दिले असता, त्याबाबत सहा.अभियंता (इ व का) एस विभाग यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये ब-याच ठिकाणी बाहेरील बाजूने दिसत असलेल्या खिडक्या या भिंती उभारुन बंद करण्यात आल्याचे तसेच काचा काढून त्याठिकाणी देखील बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले असे नमुद केले आहे. (पृष्ठ क्र.प-141 ते प-145)(**संबंधित छायाचित्रे** - पृष्ठ क्र.प-310 ते प-314)

सन 2009 मध्ये इमारत प्रस्ताव खात्याकडून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ड्रिम्स मॉल या व्यवसायिक इमारतीमधील विविध गाळयांमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत पोटमाळयांच्या बांधकामांबाबत सन 2011 पासून इमारत व कारखाने एस विभाग यांच्याकडे वेगवेगळया तक्रारी प्राप्त होत होत्या व प्रचलित पध्दतीप्रमाणे त्या अनुषांगाने कारवाई देखील चालू होती.(पृष्ठ क्र.प-147 ते प-223) सदर कारवाई दरम्यान अनधिकृत बांधकामांबाबतची पहाणी वेळोवेळी संबंधित अधिकारी यांनी केली होती. तरीही दर्शनी भागात अनधिकृतपणे भिंती उभारुन बंद केलेल्या खिडक्या दुर्घटना घडेपर्यंत लक्षात येऊ नये ही बाब शंकेस वाव देणारी आहे. तसेच ड्रिम मॉलच्या आगीच्या दुर्घटनेपूर्वी उप

आयुक्त(परि-6) यांच्या आदेशान्वये टेरेसवरिल अनधिकृत बांधकामावरील कारवाई दरम्यान पदनिर्देशित अधिकारी यांनी सुध्दा ब-याच ठिकाणी अनधिकृतरित्या खिडक्या बंद असल्याची दखल घेतली नाही. ड्रिम्स मॉल येथील गाळयांमध्ये पोटमाळयाच्या अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने 2014 ते 2018 या कालावधीत कार्यरत कर्मचा-यांनी अपेक्षित कारवाई केली नाही या कारणास्तव संबंधितांची प्राथमिक चौकशी, चौकशी खात्यामार्फत सुरु असल्याचे समजते.

**अग्निशमन दल**

ड्रिम्स मॉल या व्यावसायिक इमारतीमध्ये दुस-या माळयापर्यंत अंशत: वापराकरिता प्रथमत: सन 2009 मध्ये अग्निशमन व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांच्या परिपूर्तीचे प्रमाणपत्र देण्यात आले होते. (पृष्ठ क्र.प-225 ते प-226) सन 2011 मध्ये तिस-या माळयावरील कार्यालयाच्या भागाचा रुग्णालयाच्या वापराकरिता बदल करण्यात आला. (पृष्ठ क्र.प-227 ते प-231) सदर वापरातील बदलाकरीताचे प्रमुख अग्निशमन अधिकारी खात्याकडून अग्निशमन व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांच्या परिपूर्तीकरीता सशर्त प्रमाणपत्र देण्यात आले होते. तद्‌नंतर सन 2015 मध्ये संपूर्ण इमारतीस(तळघर + तळ मजला (निम्नस्तर)+ तळ मजला(उच्चस्तर) + 1 ला मजला + 2 रा मजला + 3 रा मजला (अंशत:) तसेच सन 2019 मध्ये दुस-या माळयावरील बँक्वेट हॉलच्या खादयगृहाकरीता अग्निशमन व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांच्या परिपूर्तीचे प्रमाणपत्र देण्यात आले होते.(पृष्ठ क्र.प-233 ते प-241) सनराईज रुग्णालयाबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडून ऑनलाईन पध्दतीने प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने अग्निशमन दलाने अग्निशमन उपाययोजनांच्या अनुषंगाने दि.03.07.2020 रोजी तपासणी केली. त्यादरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधितांनी पूर्तता केल्यानंतर दि.15.07.2020 रोजी फेरतपासणी करण्यात आली व त्रुटींची पुर्तता झाल्याची खात्री केल्यानंतर दि.22.07.2020 रोजी प्रमाणपत्र देण्यात आले.(पृष्ठ क्र.प -243 ते प-263)

महाराष्ट्र आग प्रतिबंध व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम 2006 अन्वये सहा.विभागीय अग्निशमन अधिकारी श्री.राजेंद्र घाडगे यांनी तत्कालिन प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्या आदेशान्वये ड्रिम्स मॉल मध्ये तपासणी करुन तेथील अग्निशमन व अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना नादुरुस्त असल्याबाबत 10 नोव्हेंबर 2020 मध्ये प्रशासक श्री.सहस्त्रबुध्दे यांना नोटीस दिली होती.(पृष्ठ क्र.प-265 ते प-269) सदर नोटीशीत नमूद केलेल्या त्रुटी व इतर शिफारशीची पुर्तता नोटीस दिल्यापासून 60 दिवसांच्या आत (अंदाजे दि.08 जानेवारी 2021 पर्यंत) करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते. त्याबाबत प्रत्यक्ष जाऊन खातरजमा करण्याची जबाबदारी स.वि.अ.अधि. श्री.राजेंद्र घाडगे यांची होती. (पृष्ठ क्र.प-289 ते प-293) तथापि ते दि.08 जानेवारी पासून दि.31 जानेवारी 2021 पर्यंत कोरोना महामारीनेग्रस्त झाल्याने रजेवर होते. सदर रजेवरुन दि.01 फेब्रुवारी 2021 रोजी श्री.घाडगे कर्तव्यावर उपस्थित झाले. दि. 04 फेब्रुवारी 2021 रोजी मे.पोना कॉर्पोरेशन यांनी ड्रिम्स मॉलबाबत अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत असल्याचे 01 जुलै 2020 ते 31 डिसेंबर 2020 या कालावधीचे प्रपत्र –ब सादर केले होते. त्याची त्यांनी अभिलेखात नोंद घेतली नाही. तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही व सर्व कागदपत्रे दि.12.03.2021 रोजी परिमंडळ-5 या कार्यालयात पाठवुन दिली. अशाप्रकारे सदर प्रकरणी त्यांचा दुर्लक्षितपणा दिसून येतो.

अग्निशमन दल नित्यपरिपत्रक क्र.59 दि.21.07.2018 अन्वये अग्निशमन यंत्रणेतील त्रुटींबाबत देण्यात येणारा 'J फॉर्म ' हा प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्या स्वाक्षरीने जाणे गरजेचे असताना

प्रस्तुत प्रकरणी त्याचे उल्लंघन झालेले दिसून येत आहे. याबाबत विचारणा करण्यात आली असता तत्कालिन प्रमुख अग्निशमन अधिकारी(प्र) यांच्या मौखिक आदेशानुसार सिटी सेंट्रल मॉल येथील आगीच्या दुर्घटनेनंतर सदर बदल करण्यात आल्याचे नमुद करण्यात आले आहे. तसेच बहुतांश अधिकारी यांनी फॉर्म J दिले असल्याचे निर्दशनास येते व ही बाब बेकायदेशिर असुन मा. आयुक्त यांच्या आदेशांचे उल्लंघन करणारी आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 परिणामकारकरित्या राबविण्याकरिता अग्निशमन दल नित्यपरिपत्रक क्र.59 दि.21.07.2018 अन्वये कार्यवाही होणे अपेक्षित होते. परंतु कोणत्याही प्रकारची मान्यता न घेता त्यामध्ये मौखिक आदेशान्वये बदल करणे हे गंभीर स्वरुपाचे आहे. जर नित्यपरिपत्रक क्र.59 दि.21.07.2018 याचे व्यवस्थितरित्या अनुपालन झाले असते तर योग्य वेळी कारवाई करुन कलम 8 अन्वये वीज व पाणी पुरवठा खंडित करुन सदर मॉल व रुग्णालय सील करणे शक्य झाले असते.

## 3. अग्निशमन तसेच अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रतिपूर्तीत मॉल/रुग्णालय व्यवस्थापनाकडून राहिलेल्या त्रुटी

प्रमुख अग्निशमन अधिकारी खात्याने ड्रिम्स मॉल या व्यवसायिक इमारतीमध्ये सन 2009 पासून केलेल्या विविध तपासण्यांअंती अग्निशमन व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांचे प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्व त्रुटींची परिपूर्ती झाल्याची खातरजमा करण्यात आली होती. तथापि, दि.25.03.2021 रोजी आगी दरम्यान पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1. आगी दरम्यान संपूर्ण मॉल/रुग्णालय येथील अग्निशमन यंत्रणा नादुरुस्त/कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले.
2. मॉलमधील दर्शनी खिडक्यांच्या मागे प्लायवुड किंवा तत्सम बांधकाम आढळून आले.
3. दुस-या माळयावर बँक्वेट हॉलच्या खादयगृहाशी निगडीत 45 अनधिकृत एल.पी.गॅस सिलेंडर आढळून आले. तसेच मोठया प्रमाणावर बँक्वेट हॉलकरिता वापरात येणारे फर्निचर व इतर सामुग्रीचा पॅसेजमध्ये केलेला साठा आगीच्या भक्षस्थानी पडला.
4. रुग्णालयात जाण्याचा मार्ग तसेच मॉलच्या सामायिक क्षेत्रात बँक्वेट हॉलमधील सामान ठेवल्यामुळे आगीच्या स्वरूपात प्रचंडपणे वाढ होण्यास कारणीभुत झाले व त्यामुळे अग्निशमन व विमोचन करतांना मोठया प्रमाणात अडचणी आल्या.
5. ड्रिम्स को.ऑप.सोसायटीच्या दिशेला असलेल्या बाजूस मॉलच्या दुस-या मजल्यापर्यंत उपलब्ध लोखंडी बाहय जीन्यात विविध निरुपयोगी/भंगार सामानाचा अस्ताव्यस्तपणे साठा केलेला आढळून आला व त्यामुळे अग्निशमन व विमोचन करतांना मोठया प्रमाणात अडचण आली.

सदर रुग्णालयाला तात्पुरते भोगवटा प्रमाणपत्र देताना इमारत प्रस्ताव खात्याने अग्निसुरक्षा प्रणाली ही महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये सुस्थितीत असल्याबाबत अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासापेक्ष असे नमूद करुन देखील त्याबाबत कोणतीही पूर्तता सदर दुर्घटना घडे पर्यंत करण्यात आलेली नव्हती. उपरोक्त सर्व कारणांमुळे अग्निशमन तसेच विमोचन कार्यामध्ये बराच अडथळा निर्माण झाला. अशाप्रकारे ड्रिम्स मॉल व सनराईज रुग्णालय या आस्थापनांच्या मालक/व्यवस्थापकांनी महानगरपालिकेची वेळोवेळी दिशाभूल

केली, तसेच आवश्यक नियमांची पूर्तता किंवा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात वारंवार टाळाटाळ केली या सर्व अनियमिततेंसाठी मॉल तसेच रुग्णालय व्यवस्थापन हे सर्वस्वी जबाबदार असल्याचे निदर्शनास येत आहे.

महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील नियमाप्रमाणे ड्रिम्स मॉलकरिता मे.पोना कॉर्पोरेशन या अनुज्ञापित अभिकरणाद्वारे दि.04.02.2021 रोजी प्रपत्र -ब जारी करण्यात आले होते. (पृष्ठ क्र. प-318) सदर प्रपत्र 1 जुलै 2020 ते 31 डिसेंबर 2020 या कालावधीकरिता देण्यात आले होते. तथापि,स.वि.अ.अ. श्री.घाडगे यांनी दि.10.11.2020 रोजी केलेल्या तापासणी दरम्यान त्यांना आढळलेल्या त्रुटींबाबत त्यांनी मॉलला फॉर्म J दिला होता. त्यामध्ये मॉलमधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित स्थितीत नसल्याचे निदर्शनास आले असे नमुद केले आहे. यावरुन मे.पोना कॉर्पोरेशन यांनी दिलेले प्रमाणपत्र हे कोणतीही पडताळणी न करता दिले असल्याची शक्यता आहे. तसेच नियमाप्रमाणे सदर प्रपत्र-ब हे मे.पोना कॉर्पोरेशन यांनी माहे जानेवारी 2020 च्या पहिल्या आठवडयात सादर करणे अपेक्षित होते तथापि त्यांनी सदर प्रपत्र विलंबाने सादर केले हे उचित नाही. यास्तव त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.

दि.27.03.2021 रोजी संयुक्त पहाणी दरम्यान निम्नस्वाक्षरीकार यांनी महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3 अन्वये सदर दुर्घटनेदरम्यान आढळलेल्या अनधिकृत एल.पी.गॅस साठयाकरीता बँक्वेट हॉल मालक/भोगवटादार यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले होते. सदर फौजदारी गुन्हयाची कारवाई सुरु असून त्याबाबतचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

## 4. अग्निशमन व विमोचनात आढळलेल्या त्रुटी -

1. निम्नस्वाक्षरीकारांच्या मुंबई अग्निशमन दलातील कारकिर्दीतील अनुभवावरुन तसेच प्रचलित ''आदर्श सुनिश्चित कार्यपध्दती''प्रमाणे सदरच्या''लेव्हल-4''च्या वर्दीवर अग्निशमन अधिकारी व कर्मचा-यामध्ये योग्य तो समन्वय साधण्याकरीता,

    -कंट्रोल पोस्ट अधिकारी

    -बी.ए. सेट अधिकारी

    -लॉजिस्टिक अधिकारी

    -पाणीपुरवठा अधिकारी इत्यादींची आवश्यकता असते.

    परंतु प्रत्यक्ष दुर्घटना स्थळी कमांड व कंट्रोल तसेच समन्वय कार्यपध्दती स्थापन करण्यात आली नव्हती.
2. सदर घटनेच्या दिवशी मुलुंड अग्निशमन केंद्रात उपलब्ध असलेले (ए.एल.पी.) विशेष वाहन यंत्रचालकाच्या अनुपलब्धतेमुळे बी.के.सी. अग्निशमन केंद्रातुन उपलब्ध करुन घ्यावे लागले सदर त्यामुळे वाहन घटनास्थळी पोहोचण्यास विलंब झाला.
3. प्रत्यक्ष दुर्घटना स्थळी अग्निशमन व विमोचनाचे कार्य परिणामकारकरीत्या पार पाडण्याकरीता उत्तम ''कमांड व कंट्रोल'' समन्वय तसेच संघभावना या बाबी आवश्यक असतात. दुर्घटना स्थळी अग्निशमन व विमोचनाचे कार्य पार पाडण्याकरीता आग विझविण्याकरीता प्रथम जाणा-

या अग्निशामकांची दमछाक टाळण्याकरीता राखीव अग्निशामकांची दुसरी फळी तसेच आग विझविण्याकरीता आवश्यक अखंड पाणी पुरवठा इत्यादी बाबींची आवश्यकता असते. आगीवर मात करण्याकरीता अग्निशमन करणारी प्रथम फळी सक्षम असल्यास त्यामुळे विमोचनाचे कार्य करणा-या फळीस ते साह्यभूत होते. सदर घटनास्थळावर मनुष्यबळावर योग्य ते नियंत्रण व समन्वय अधिक प्रभावीपणे साधता येणे शक्य होते.

4. आदर्श सुनिश्चित कार्यपध्दती मधील निर्देशांनुसार प्रमुख अग्निशमन अधिकारी, लेव्हल 2 नंतर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या वरिष्ठ अधिका-यांच्या संपर्कात असणे आवश्यक होते तथापि सदर प्रकरणी प्रमुख अग्निशमन अधिकारी हे लेव्हल 3 पर्यंत वरिष्ठ अधिकारी तसेच आपत्कालीन कक्ष अधिकारी यांच्या संपर्कात नव्हते. अशाप्रकारे संपर्क तसेच माहिती देवाणघेवाणीतील त्रुटी या ठिकाणी निदर्शनास आल्या.
5. मुंबई अग्निशमन दल नियंत्रण कक्ष व कंट्रोल पोस्ट यामधील ऑकरंन्स बुक तपासले असता, ड्रिम्स मॉल येथे रुग्णालय असून सुध्दा प्रथम अधिकारी यांनी सुमारे एक तासापर्यंत नियंत्रण कक्ष व आपत्कालीन नियंत्रण कक्ष यांना तशी माहिती न दिल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येण्यास वेळ लागला व त्यामुळे रुग्णवाहिकेची व्यवस्था, जवळील रुग्णालयांना सतर्क करणे इ. गोष्टींसाठी विलंब झाला.

**उपरोक्त विवेचनावरुन प्रस्तुत प्रकरणी खालील निष्कर्ष व त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कारवाई प्रस्ताविण्यात येत आहे.**

माहे मार्च 2020 पासून मुंबई शहरासह संपुर्ण देशात कोव्हिड महामारीचा प्रादुर्भाव वाढला होता. अशा उग्र स्वरुपाच्या महामारीमध्ये रुग्णालयांची मोठया प्रमाणात निकड भासत होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे अनेक ठिकाणी तात्पुरत्या वैद्यकीय सुविधा तसेच रुग्णालये उभारणीची कार्यवाही करण्यात आली असून ती आजतागायत सुरु आहे. तसेच अनेक अपुर्ण अथवा बंद वैद्यकीय/रुग्णालय सुविधा तात्काळ कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. साथरोग आजार व आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार महानगरपालिका परिक्षेत्रातील साथरोगाचे प्रतिकुल परिणाम आटोक्यात आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे अधिकार महानगरपालिका प्रशासनास प्राप्त आहेत. उपरोक्त पार्श्वभुमीवर सदर प्रकरणी सनराईज रुग्णालयातील वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याचा दृष्टीने मंजुरीची कार्यवाही महानगरपालिका प्रशासनामार्फत गतिमान पध्दतीने करण्यात आली. तथापि असे निदर्शनास येत आहे की, रुग्णालय व मॉल प्रशासनामार्फत सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आवश्यक खबरादारी घेण्यात आलेली नाही.

- सदर प्रकरणी प्रमुख अभियंता (वि.नि.) यांनी इमारत प्रस्ताव खात्यातील संबंधित कर्मचारी/अधिका-यांमार्फत दिलेल्या परवानग्यांची पुर्न:पडताळणी करुन पुढील कार्यवाही करावी.
- ड्रिम्स मॉल येथील दुस-या माळयावरील बँक्वेट हॉल येथे दोन एल.पी.गॅस सिलेंडरची परवानगी असताना अग्निशमना दरम्यान 45 एल.पी.गॅस सिलेंडर अनधिकृतपणे साठा केलेले आढळून आले. याबाबत काय कारवाई केली याची सहाय्यक आयुक्त 'एस' विभाग यांनी पडताळणी करुन पुढील कार्यवाही करावी.

- ड्रिम्स मॉल या ठिकाणी इमारत व कारखाने एस विभाग यांनी सन 2019 मध्ये गाळयांमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना दर्शनी भागातील खिडक्यांमागे उभारलेल्या अनधिकृत भिंती/प्लायवुड शिट यावर देखील कारवाई करणे अपेक्षित होते तथापि संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. याबाबत उप प्रमुख अधिकारी चौकशी(परिमंडळ-6) यांच्याकडे सुरु असलेल्या प्राथमिक चौकशीची व्याप्ती वाढवुन सदर मुद्दयांच्या अनुषंगाने चौकशी करण्यात यावी.
- महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार अग्निशमन दलाने अग्निसुरक्षेच्या दृष्टीकोनातून ड्रिम्स मॉल व सनराईज रुग्णालय या ठिकाणी केलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या पूर्तता झाली असल्याबाबत अपेक्षित असलेला पाठपुरावा करणे आवश्यक होते. तथापि, त्रुटींच्या पडताळणीमध्ये विलंब झाल्याचे निदर्शनास येते. यास्तव स. वि.अ.अ. श्री. राजेंद्र घाडगे यांची, तसेच कोणत्याही मान्यतेविना नित्यपरिपत्रक क्र.59 दि.21.07.2018 यात बदल करुन तसे मौखिक आदेश देऊन मा.आयुक्त यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत तत्कालिन प्रमुख अग्निशमन अधिकारी(प्र) श्री.एस.ए.काळे, यांची खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.
- महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील नियमाप्रमाणे ड्रिम्स मॉलकरिता मे.पोना कॉर्पोरेशन या अनुज्ञापित अभिकरणाद्वारे 1 जुलै 2020 ते 31 डिसेंबर 2020 या कालावधीकरिता अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबत प्रमाणपत्र देण्यात आले होते परंतु प्रत्यक्ष घटनेच्यावेळी सदर ठिकाणची अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यन्वित नव्हती. याकरीता मे.पोना कॉर्पोरेशन यांचे अनुज्ञापन रद्द करण्यासाठी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना कळविण्याबाबत तसेच त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत प्रमुख अग्निशमन अधिकारी यांना निर्देश देण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.
- महानगरपालिकेच्या विविध खात्यांमार्फत परवानग्या घेताना आवश्यक असलेल्या अटींच्या पुर्ततेकरीता वारंवार निर्देशित करुन देखील त्याबाबत कुठलीही कारवाई न केल्याने सदर दुर्घटनेकरीता जबाबदार म्हणुन ड्रिम्स मॉल व सनराईज रुग्णालय यांच्या मालक/व्यवस्थापकांवर फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्याचे तसेच महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार सदर ठिकाणचे पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.
- दि.27.03.2021 रोजी संयुक्त पहाणी दरम्यान प्रमुख अग्निशमन अधिकारी यांना ड्रिम्स मॉल व सनराईज रुग्णालय व मे.पोना कॉर्पोरेशन यांच्या मालक/व्यवस्थापकांवर तसेच सहाय्यक आयुक्त एस विभाग यांना ड्रिम्स मॉल येथील बँक्वेट हॉलच्या मालक/व्यवस्थापकांवर फौजदारी गुन्हा नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याबाबत प्रमुख अग्निशमन अधिकारी व विधी अधिकारी यांनी पाठपुरावा करावा असे प्रस्ताविण्यात येत आहे.

## 5. शिफारशी

**वरील सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहे.**

1. मुंबई अग्निशमन दलाची '' आग व विमोचन आदर्श सुनिश्चित कार्यपध्दती " प्रभावीपणे राबविण्यात यावी व त्यामधील काही सुधारणा आवश्यक असल्यास पुनर्विलोकन करण्यात यावे. तसेच मुंबई अग्निशमन दल व मनपाचे इतर विभाग यांचे अधिकारी यांच्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष घटनास्थळी समन्वय साधण्याकरिता सुनिश्चित कार्यप्रणाली निश्चित करण्यात यावी.
2. ''आग व विमोचन आदर्श सुनिश्चित कार्यपध्दतीतील कमांड व कंट्रोलच्या संकल्पनेस''अनुसरुन परिमंडळ निहाय अग्निकवायतीचे नियमित आयोजन खालीलप्रमाणे करण्यात यावे जेणेकरून प्रत्यक्ष दुर्घटनेच्यावेळेस सदर कार्यपध्दती प्रभावीपणे अंमलात आणता येईल.

| हुददा | शेरा |
|---|---|
| प्रमुख अग्निशमन अधिकारी - | तीन महिन्यातून एकदा |
| उप प्रमुख अग्निशमन अधिकारी | दोन महिन्यातून एकदा |
| विभागीय अग्निशमन अधिकारी | महिन्यातून एकदा |
| सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी | 15 दिवसातून एकदा |

3. कोव्हीड-19 च्या संसर्गजन्य आजारामुळे उदभवलेल्या परिस्थितीमुळे नियमित होणा-या अग्निकवायती मध्ये आवश्यक ते बदल करुन सुधारित ''एक अग्निशामक अग्निकवायत'' प्रस्थापित करुन अग्निशामक ते केंद्र अधिकारी पदापर्यंतच्या अधिका-यांकरीता सदर अग्निकवायत बंधनकारक करणे.
4. अग्निशमन व विमोचनाचे कार्य करताना अग्निशामक/अग्निशमन अधिकारी शारिरीकदृष्टया सक्षम असणे गरजेचे असते. अग्निशमन कर्मचारी तसेच अधिकारी यांचा वार्षिक स्वयं:मूल्यमापन अहवाल भरताना ''क्षेत्रीय काम करण्याची क्षमता'' हा रकाना भरताना प्रत्येक अग्निशामक/अग्निशमन अधिकारी यांना पुढील नमूद चाचणी यशस्वीरित्या पार करणे बंधनकारक राहील. सदर चाचणीचा वार्षिक अहवाल त्यांना देण्यात येणा-या पदोन्नतीच्या वेळेस ग्राह्य धरण्यात यावा.(**पृष्ठ क्र. प-317 वरील संकल्पचित्राप्रमाणे**)
5. अग्निशमन दलाचे कार्य पूर्ण कार्यक्षमतेने होण्याकरीता दलाचा उत्तम प्रतिसाद तसेच प्रत्यक्ष दुर्घटनास्थळी जाऊन जीव व मालमत्तेस कमीत कमी नुकसान होण्याकरीता केलेल्या परिणामकारक उपाययोजना या बाबींवर अवलंबून असते.''महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम-2006'' या कायद्यातील तरतुदी परिणामकारकरित्या राबविणे ही सुध्दा तितकीच महत्वाची बाब आहे. याकरीता तपासणी तसेच अग्निशमन दलातर्फे दिल्या जाणा-या विविध परवानग्यांच्या पध्दतीत खालीलप्रमाणे बदल सुचवित आहे.

   - ऑटो-डीसीआर कक्ष

- भोगवटा प्रमाणपत्र व अग्निशमन दल नित्यपरिपत्रक क्र.59 दि.21.07.2018 नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये तपासणी कक्ष
- विविध आस्थापनांसाठी अग्निसुरक्षा प्रमाणपत्र/पुर्तता प्रमाणपत्रा करीता सी. पी. डब्ल्यु. एम.कक्ष
- विभाग कार्यालया स्तरावरील अनुपालन कक्ष

6. ब-याच आगींच्या प्रकरणांमध्ये आगीचे कारण हे शॉर्ट सर्किट असल्याचे निदर्शनास येत आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 यामध्ये विद्युत परिक्षणाबाबत कोणतीही तरतुद नाही. राज्यातील अग्निशमन यंत्रणेच्या सशक्तीकरणाकरिता याबाबत परिशिष्ट- 8 मध्ये विविध बदल सुचविले आहेत ते कायदयात अंर्तभूत करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत विविध रुग्णालये तसेच कोविड सेंटर याठिकाणी लागलेल्या आगीच्या अनुषंगाने मुख्य विद्युत निरिक्षक , भारत सरकार यांच्या क्र.सीईआय /1/9/2020/263- 294 दि.03.05.2021 अन्वये प्रसारित करण्यात आलेल्या परिपत्रकामधील सुरक्षा नियमावलीची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

7. मुंबई अग्निशमन दलामध्ये अंदाजे 700 अग्निशामक, 160 यंत्रचालक यांच्या जागा रिक्त असल्याचे समजते. त्याचप्रमाणे सेवानिवृत्तीची संख्याही जास्त आहे. तसेच अधिकारी वर्गाची देखील अनेक पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीती प्रमुख अग्निशमन अधिकारी(प्र) व दोन उप प्रमुख अग्निशमन अधिकारी(प्र) म्हणुन कार्यरत आहेत. यामधील समतोल साधण्याकरिता दलामध्ये नियमित कालावधीमध्ये भरती प्रक्रीया राबविणे ही आवश्यक बाब आहे.

8. अग्निशमन दलातील रिक्त पदांमुळे विशेष वाहने (ALP, TTL, Hazmat vehicle) बंद रहातात त्यामुळे दुर्घटनेच्यावेळी प्रतिसाद वेळेत वाढ होते. याकरीता प्रमुख अग्निशमन अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

9. महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये अग्निसुरक्षा उपाययोजनांचे उल्लंघन केल्यानंतर दिल्या जाणा-या नोटीशींची कायदेशीर अंमलबजावणी करुन भोगवटादार/मालक यांच्यावर होणारी कारवाई अग्निशमन दल नित्यपरिपत्रक क्र.59 दि.21.07.2018 नुसार होत आहे किंवा नाही यावर प्रमुख अग्निशमन अधिकारी यांनी स्वत: पर्यवेक्षण करावे. त्याचप्रमाणे या कायद्यानुसार होणा-या कायदेशीर कारवाई करीता व कायद्याचा वचक असावा यासाठी मुंबई अग्निशमन दलातील सहा समादेशक केंद्रांकरिता स्वतंत्र विधी अधिकारी नियुक्त करण्यात यावा.

10. मुंबई शहराकरीता अद्ययावत फायर हझार्ड रिस्पॉन्स ॲण्ड मिटीगेशन प्लान (आराखडा) तयार करण्याची आवश्यकता आहे.

11. नागरी सुरक्षा दलातील मनुष्यबळास अग्निसुरक्षेचे प्राथमिक प्रशिक्षण असतेच. परंतु त्यांना अग्निसुरक्षेचे सविस्तर प्रशिक्षण दिल्यास मुंबई अग्निशमन दलास सहाय्यभूत दुर्घटनेच्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध होईल.

12. सद्याच्या परिस्थितीमध्ये कोव्हिड-19 करीता वापरात असलेली जुनी रुग्णालये व तात्पुरत्या स्वरुपात उभारलेली कोरोना काळजी केंद्रे या ठिकाणी राष्ट्रीय इमारत संहिता व महाराष्ट्र आग

प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील तरतुदींचे तंतोतंत पालन करणे शक्य होत नसल्यामुळे त्वरित उपाययोजना म्हणुन अशा रुग्णालयांमधील आय.सी.यु. वॉर्डमधील उच्चदाबावर आधारित वॉटर मिस्ट प्रणाली व दोन मान्यता प्राप्त संस्थांतील प्रशिक्षित अग्निशामक सतत नेमण्यात यावेत. या अग्निशामकांना एक आवरण असलेले पी.पी.ई. हँडग्लोव्हज, हेलमेट व गमबुट यांची व्यवस्था करण्यात यावी. अशाप्रकारच्या प्रणालीचा उपयोग मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत उभारण्यात आलेल्या जंबो कोव्हिड सेंटर येथे करण्यात येत आहे. त्यामुळे दि.04.04.2021 रोजी दहिसर टोलनाका या ठिकाणी लागलेल्या आगीच्या वेळी त्या ठिकाणी तैनात करण्यात आलेले सुरक्षा रक्षक व फायर मार्शल, त्याचप्रमाणे मुंबई अग्निशमन दलातील कर्मचारी यांनी त्वरित आग विझवून 50 रुग्णांची सुरक्षित सुटका करुन आगीवर त्वरित नियंत्रण मिळवण्यात आले होते व त्यामुळे होणारी जिवितहानी टाळण्यास मदत झाली होती.

13. तक्रार निवारण कक्ष:

-तक्रार निवारण कक्षा मधूनच सर्व तक्रारींची सध्य स्थिती कळावी.

-एकाच तक्रारी संदर्भात विविध विभागांशी संबंधित असल्यास त्याकरीता एकच तक्रार क्रमांक नोंदविण्यात यावा. एकाच प्रकारची तक्रार प्राप्त झाली असल्यास सदर तक्रार त्याप्रकारे नोंद घेण्यात यावी. यामुळे वेळेचा होणारा अपव्यय टळेल व एकाच तक्रारी संदर्भात विविध आस्थापनांचा अहवाल एकाच ठिकाणी उपलब्ध होईल.

-एखाद्या आस्थापने संदर्भात एखाद्या तक्रारदाराकडून वारंवार तक्रार करण्यात येत असल्यास अशा तक्रारींची नोंद घेऊन दप-तरी दाखल केल्यामुळे वेळ व मनुष्यबळाची बचत होईल.

14. कोणत्याही दुर्घटनेच्या वेळी योग्य तो सुनिश्चित प्रतिसाद देण्याकरीता मुंबई महानगर पालिकेचे आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष, मुंबई अग्निशमन दल तसेच सुरक्षा विभाग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. सध्या उद्भवलेला कोव्हीड-19 च्या संसर्गजन्य आजाराकरीता महानगर पालिकेमार्फत विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या जम्बो कोव्हीड सेंटरमध्ये काही ठिकाणी झालेल्या आगीच्या दुर्घटनांच्या वेळी अग्निशमन दल व सुरक्षा दलाच्या कर्मचा-यांनी दाखविलेल्या समन्वयांमुळे मोठया प्रमाणावर होणा-या दुर्घटना टाळल्या गेल्या आहेत. आपात्कालीन परिस्थितीत मनपा विभागातील आपत्कालीन नियंत्रण कक्षात नियुक्त करण्यात येत असलेले मनपा सुरक्षा रक्षक व विभागीय नोडल ऑफिसर यांच्यात समन्वय होऊन प्रत्यक्ष दुर्घटनास्थळी लागणारी मदत यांचे योग्य नियोजन करणे शक्य होईल. सदर बाब मुंबई अग्निशमन दल, आपत्कालीन कक्ष व विभागीय नियंत्रण कक्ष यांच्याद्वारे अधिक परिणामकारकपणे राबविणे शक्य होईल. आपत्कालीन परिस्थितीत उद्भवणा-या परिस्थितीतला सुनिश्चित प्रतिसाद देण्याकरीता आपत्कालीन कक्ष, अग्निशमन विभाग तसेच सुरक्षा विभागा हे एका अधिपत्याखाली कार्यरत केल्यास "आपत्कालीन योजना" योग्य त्या नियोजनाने व परिणामकारक अमंलबजावणीने अंमलात आणली जाऊ शकते.

15. बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा रक्षक यांना नियमितरित्या आपत्कालीन व्यवस्थापन व अग्निशमन दल यांच्या सहयोगाने फायर मार्शल प्रशिक्षण देण्यात यावे व सदर फायर मार्शल महानगरपालिकेच्या महत्वाच्या ठिकाणी जसे रुग्णालय , विभाग कार्यालय, मनपा मुख्यालय इ.

ठिकाणी सुरक्षा रक्षक व फायर मार्शलचे काम करतील. त्यामुळे अशा ठिकाणी आग किंवा इतर दूर्घटना झाल्यास त्यावर त्वरित उपाय करणे शक्य होईल.

16. सदर आगीच्या दुर्घटनेमध्ये कोव्हिड परिस्थितीची जोखीम पत्करुन कोव्हिडग्रस्त रुग्णांना सुखरुप वाचविण्यात आले. यास्तव सदर अग्निशमन कार्यातील सहभागी कर्मचारी/अधिकारी यांना मा.राष्ट्रपती यांच्या शौर्य पदाकरिता/मा.आयुक्त यांच्या रजत पदासाठी शिफारस करण्याकरीता समिती स्थापन करण्यात यावी.

7/5/21

**श्री.प्रभात रहांगदळे**
**उप आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन)**
**तथा चौकशी अधिकारी**